



# यशामागचे अदृश्य हात माझे गुरू..

सन १९९२ चा तो सुवर्णक्षण. शिवाजी विद्यापीठातील एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, भौतिकशास्त्र विभाग. स्वागत समारंभात, १९९२ हा फोटो पाहिला की मन एका क्षणात ३४ वर्षे मागे धावतं. त्या क्षणी जे मिळालं ते आयुष्यभराचं शिदोरी ठरलं. समोर उभे होते माझे गुरू डॉ. ए. एस. वायंगणकर, डॉ. एस. आर. सावंत आणि डॉ. एम..बी. डोंगरे. आज इतक्या वर्षांनंतरही त्यांचे चेहरे, त्यांचा आवाज, त्यांचे शब्द तितकेच स्पष्ट आठवतात, जणू काळाने त्यांना स्पर्शही केला नाही. या तिन्ही गुरूमुळे माझ्या आयुष्याला कलाटणी मिळाली.संशोधन क्षेत्रात डॉ. गौरीश नाईक, तर प्रशासनात डॉ. माणिकराव साळुंखे आणि डॉ. बी. पी. साबळे यांच्यासह अनेक गुरुजनांनी माझी जडणघडण केली. आज संशोधन, नेतृत्व आणि समाजकार्यात जे काही यश मिळाले आहे, ते या सर्व गुरूंच्या आशीर्वादाचे फळ आहे.

-डॉ. राजनीश कामत, कुलगुरू.

29 JUL 2026
सकाळ

# 'कॅरी ऑन'मधील विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्यास उद्यापर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठातर्फे २०२५-२६ मधील विशेष प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी मार्च/एप्रिल २०२६ परीक्षेचे अर्ज भरण्यास ३० जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानंतर आणि विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. अशी माहिती परीक्षा विभागातर्फे देण्यात आली.

विद्यापीठाने महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, विभागप्रमुखांना प्रक्रियेची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज महाविद्यालयात भरल्यानंतर महाविद्यालयांनी ते तत्काळ विद्यापीठाकडे सादर करावेत. परीक्षा अर्ज भरण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नसल्याने संबंधित विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी वेळेत प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

29 JUL 2026
तरुण भारत

थोडक्यात

## 'कॅरी ऑन' अंतर्गत प्रवेशासाठी मुदतवाढ

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विषेश प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मार्च/एप्रिल २०२६ (उन्हाळी सत्रातील) परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली. उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचने विशेष प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत परीक्षा घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार विद्यापीठ परीक्षा विभागाने नियोजन केले होते. सदर परीक्षेचे परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवार दि. २३ ते दि. २७ रोजीपर्यंत मुदत होती. दि. २८ रोजी महाविद्यालय व अधिविभागांनी परीक्षा याद्या जमा करावयाच्या होत्या. तथापी विद्यार्थी हितासाठी यामध्ये अर्ज भरण्यासाठी गुरुवार (दि. ३०) पर्यंत मुदतवाढ दिली आहे. नियोजित कालावधीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागात परीक्षा अर्ज भरावे, असे आवाहन प्री. एक्झाम विभागाने केले आहे.

29 JUL 2026
लोकमत

# 'कॅरी ऑन'ना दिलासा; परीक्षा अर्जाला मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील विशेष प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मार्च/एप्रिल २०२६ परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम मुदत गुरुवारपर्यंत वाढविली आहे. यासंबंधीचे परिपत्रक मंगळवारी जारी केले. यासंदर्भात २१ जुलै रोजी सर्किट बेंचमध्ये याचिका दाखल झालेली होती. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज व परीक्षा शुल्क स्वीकारून ते ३० जुलैपर्यंत विद्यापीठाकडे जमा करावेत, तर अर्जांच्या याद्या ३१ जुलैपर्यंत सादर कराव्यात. विद्यापीठाने ३० जुलैनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करत संबंधित महाविद्यालयांनी अर्ज भरण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

29 JUL 2026

जनप्रवास

# 'बदलत्या डिजिटल युगात नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करा'

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने, 'मिडिया अँड कम्युनिकेशन क्लब' अंतर्गत ६३ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने विशेष ऑनलाईन व्याख्यानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार होते

या कार्यक्रमासाठी गुजरात केंद्रीय विद्यापीठाचे सहाय्यक ग्रंथपाल व विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. भावेश पटेल हे मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ. पटेल यांनी शैक्षणिक संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'झोटेरो' सारख्या संदर्भ व्यवस्थापन साधनांचा प्रभावी वापर कसा करावा, याविषयी प्रात्यक्षिकासह सविस्तर माहिती दिली. डॉ. डी. बी. सुतार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संशोधकांनी बदलत्या डिजिटल युगात नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

मुख्य वक्त्यांचा परिचय डॉ. वाय. जी. जाधव यांनी करून दिला. व्याख्यानानंतर झालेल्या शंका-निरसन सत्राचे संचालन उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी केले. या प्रसंगी सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सुकेशानी कांबळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. विनोद गुरव यांनी मानले.

डॉ. शिवाजी जाधव, प्रा. निशा मुढे-पवार आणि प्रा. अक्षय सरवदे यांचे विशेष सहकार्य लाभले. या व्याख्यानाला विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 9 JUL 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ८६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवार दि.२८ रोजी ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ८६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रणसाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद करण्यात आली नाही. परीक्षेत शिस्त राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

29 JUL 2026
सकाळ

# विद्यापीठाकडून ८६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे बी.एस्सी.हॉटेल मॅनेजमेंट सेमिस्टार-तीन व चार, पीएच.डी. कोर्सवर्क-आयडीएस, सायन्स अँड टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांचे निकाल आज जाहीर झाले. आजअखेर ८६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकाकडून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतून आज कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे केली नाही.

29 JUL 2026
लोकमत

# एआयच्या साहाय्याने संशोधन प्रभावी : पटेल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रात 'झोटेरो विथ एआय : स्मार्टर रेफरन्स मॅनेजमेंट फॉर अकॅडेमिक रिसर्च' या विषयावर मंगळवारी विशेष ऑनलाइन व्याख्यान झाले. गुजरात केंद्रीय विद्यापीठाचे सहायक ग्रंथपाल डॉ. भावेश पटेल यांनी संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'झोटेरो'चा प्रभावी वापर कसा करावा, याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. डॉ. डी. बी. सुतार अध्यक्षस्थानी होते. डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वाय. जी. जाधव यांनी परिचय करून दिला. शंका-निरसन सत्राचे संचालन उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी केले. यावेळी सहायक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात उपस्थित होते. सुकेशानी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विनोद गुरव यांनी आभार मानले.

2 9 JUL 2026

सकाळ

# विद्यापीठात 'झोटेरो वुईथ एआय'वर व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग आणि बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिडिया अँड कम्युनिकेशन क्लब' अंतर्गत 'झोटेरो वुईथ एआय : स्मार्टर रेफरन्स मॅनेजमेंट फॉर अकॅडेमिक रिसर्च' विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान झाले. गुजरात केंद्रीय विद्यापीठाचे सहायक ग्रंथपाल व विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. भावेश पटेल मुख्य यांनी शैक्षणिक संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'झोटेरो' सारख्यासंदर्भ व्यवस्थापन साधनांचा प्रभावी वापर कसा करावा, याविषयी प्रात्यक्षिकासह माहिती दिली. ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार यांनी संशोधकांनी बदलत्या डिजिटल युगात नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. शंका-निरसन सत्राचे संचालन उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी केले. सहायक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात उपस्थित होते.

2 9 JUL 2026
पुढारी

# विद्यापीठाकडून ८६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर सुमारे ८६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे सुरू आहेत. दि. २८ रोजी बी.एस्सी. (हॉटेल मॅनेजमेंट), पीएच.डी. कोर्सवर्क आणि सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. परीक्षेदरम्यान गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विद्यापीठाने भरारी पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील परीक्षा केंद्रांची पाहणी केली. तपासणीत कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीकडे झाली नसल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.